**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वनविभाग**
**जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, रायगड अलिबाग**
**हिराकोट तलावाजवळ, ता.अलिबाग, जि.रायगड 402 201**
दुरध्वनी क्र. 02141/222118 फॅक्स क्र. 02141/227451, Email: dcraigad@gmail.com

**(सामान्य शाखा) क्र.साशा/ब-5/**करोना विषाणूबाबत आवाहन /**2020** दि.१८ **/03/2020**

# आवाहन

सध्या जगभरात पसरलेल्या कोरोना विषाणूची लागण राज्यातील काही भागात झाली आहे. सदर रोगाचा प्रसार टाळण्यासाठी शासनाने राज्यभर अनेक प्रतिबंधात्मक उपाययोजना लागू केलेल्या आहेत. शासनाने कोरोना विषाणूचा (COVID-19) प्रादूर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा, 1897 दि.13/03/2020 पासून लागू करुन खंड 2, 3 व 4 मधील तरतूदी नुसार अधिसूचना निर्गमित केलेली आहे व त्यानुसार राज्यातील आंगणवाड्या, शाळा, महाविद्यालये, चित्रपटगृहे, तरणतलाव, व्यायाम शाळा, नाट्यगृहे, मॉलस् इ. स्वरुपाच्या जमाव / लोकांचा समूह एकत्र येण्याची ठिकाणे दि.31/03/2020 अखेरपर्यंत बंद ठेवण्याचे निर्देश दिलेले आहेत. जेणे करुन राज्यात कोरोना विषाणूच्या प्रसारास प्रतिबंध करता येईल.

या कार्यालयाकडून यापुर्वीच महाराष्ट्र पोलीस अधिनियम 1951 चे कलम 37 (1) (3) नुसार रायगड जिल्हा पोलीस कार्यक्षेत्राच्या हद्दीत पूर्व परवानगीशिवाय पाच अगर पाचाहून अधिक व्यक्तींचा समावेश असलेल्या कोणत्याही प्रकारच जमाव जमविण्यास किंवा मिरवणूक काढण्यास प्रतिबंध करण्यात आलेला आहे.

रायगड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात समुद्र किनारा लाभला असून, सदर समुद्र किनाऱ्यास तसेच जिल्ह्यातील पर्यटन स्थळे, किल्ले, तिर्थक्षेत्र, धार्मिक स्थळे इ. ठिकाणास मोठ्या प्रमाणात पर्यटक व भाविक भेट देत असतात. अशा ठिकाणी गर्दी सदृश्य स्थिती निर्माण झाल्यामुळे, कोरोना विषाणूचा प्रसार होण्याचा धोका जास्त प्रमाणात आहे.

याद्वारे, जिल्ह्यातील सर्व तिर्थक्षेत्र व धार्मिक स्थळे यांच्या व्यवस्थापकांना आवाहन करण्यात येते की, कोरोना विषाणूचा प्रसारास प्रतिबंध करण्यासाठी सदर तिर्थक्षेत्र, धार्मिक स्थळे इ. ठिकाणी कोरोना विषाणूचा धोका टळेपर्यंत कोणत्याही धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करू नये जेणे करुन सदर ठिकाणी भाविक मोठ्या प्रमाणात एकत्र येणार नाहीत. तसेच जिल्ह्यात येणाऱ्या पर्यटकांनाही आवाहन करण्यात येते की, कोरोना विषाणू चा धोका टळेपर्यंत आपण शक्यतो जिल्ह्यातील समुद्र किनारे, किल्ले, पर्यटन स्थळे इ. भेटी देण्याचे टाळावे व घरीच सुरक्षित ठिकाणी कुंटुंबियासोबत वेळ घालवावा.

(निधी चौधरी)
जिल्हाधिकारी तथा
जिल्हादंडाधिकारी रायगड